# चित्ररंग

सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर यांच्या निवडक गीतांचा संग्रह...

**बाबासाहेब सौदागर**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**चित्ररंग : बाबासाहेब सौदागर**

© **डॉ. वृषाली बाबासाहेब सौदागर**

'चित्ररंग' बंगला, रासकनगर, बेलापूर रोड,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर.
मो. ९२२६१८००३९, ९५२७१९२९२५, ९२२५७१५१२५

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

## *प्रस्तावना...*

**श्री. चंद्रकांत विश्वनाथ पालवे**

जेव्हा कधी काही खूप उत्कटतेने लिहिलेले वा ऐकलेले आढळते तेव्हा तेथे मला नेहमी लयबद्ध स्पंदनांचा साक्षात्कार होतो, अशा वेळी नेहमी एखाद्या सुंदर स्वरासाठी शब्दांनी पूर्णपणे समर्पित व्हावे अशी परिस्थिती निर्माण होते. काव्य हा प्रकार साहित्यात हृदयातून उमटलेला सहजसुंदर बोल आहे, हे निश्चित. कविवर्य श्री. बाबासाहेब सौदागर हे गेली १५-२० वर्षे चित्रपटासाठी गीतलेखन करतात.

साधारणपणे चित्रपटांसाठी लिहिलेल्या कवितांचा, गाण्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यास कवीच फारसा उत्सुक नसतो. चित्रपटांच्या माध्यमातून त्या कवींचे वाङ्मय रसिकापर्यंत पोचलेले असते. दृक् माध्यमांमुळे या गीतकारांना बऱ्याचदा अनेक सार्वजनिक मुलाखतींना देखील सामोरे जावे लागते. एखादे गीत खूप प्रसिद्धीस पावले की, गीतकारांना त्यांचे रहस्य विचारले जाते, अगदी कवीच्या व्यक्तिगत जीवनाशी बहुधा अशा गीतांच्या रचनेचा खूपसा संबंध नसतोच. चित्रपटांच्या कथानुक्रमाने त्या गीताचे महत्त्व असल्याचे मानले जाते.

या बाबतीत कविवर्य बाबासाहेब सौदागर यांची गाणी थोडीशी वेगळी आहेत. श्री. सौदागर अहोरात्र कवितांच्या तंद्रीत असतात. त्यांच्या अससपास घडणाऱ्या सर्व घटनांचे ते डोळस साक्षीदार असतात. विशेषत: ग्रामीण भागातले एकूण वास्तव्य त्यांच्या डोळ्यासमोर उभे असते. खेड्यापर्यंत पोहोचलेल्या नवीन संस्कृतीचे, माध्यमाचे अतिक्रमण त्यांना व्यथित करते. बारी, तमाशा, कलाकेंद्र इ. ठिकाणी आपली नृत्यकला पेश करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत ते संवेदित असतात. लावणी, पोवाडे, द्वंद्वगीते, सवाल-जवाब, गणगौळण हे सारे मन:चक्षुपुढे उभे असते. त्यामुहे ज्या कथानकाची मागणी ह्या स्वरूपाची असते त्यात त्यांना गीतलेखन करणे अधिक आनंदाचे वाटते.

श्री. बाबासाहेब सौदागर यांचे बालपण, कुमारवय खूपच हालअपेष्टात गेले. त्यामुळे त्यांच्या कवितेला बऱ्याचदा वेदनांची एक किनार आहे. थोड्याशा

हळवेपणाने ते अधिक संवेदनशील होतात. एकूण महाराष्ट्रात रुजलेली मराठमोळी संस्कृती यांचे त्यांना विलक्षण आकर्षण आहे.

आज गीतलेखनाचे क्षण अनेक दिशेने बदलले आहे. संगीतात होणारे (पाश्चात्त्य संगीतामुळे) बदल आशयापेक्षा ध्वनी रंजित शब्दरचनेचे आज चित्रपट सृष्टीत आकर्षण आहे. त्यात कवी श्री. सौदागर यांचा काव्यगुण नेमकाच खेड्यातल्या वातावरणात फुलत गेलेला. त्यामुळे रसिकांना मराठी मातीचा वेगळा आविष्कार करण्याची जबाबदारी त्याच्यावर आपोआप येते. त्यांना चित्रपट क्षेत्रातील चांगली माणसे वेळेवर भेटल्याने ते नेहमी त्या सर्व चित्रपटसृष्टीतल्या प्रसिद्ध व्यक्तीबाबत कृतज्ञ असल्याचे उल्लेख करतात. गेली २०-२२ वर्षे मी कविवर्य श्री. बाबासाहेब सौदागर यांचे काव्यजग जवळून अनुभवत आहे.

त्यांच्या कवितेचे शब्द जीव लागण्याइतके मधुर सुंदर असतात. निसर्गाचे तेथील सूर तरुणाचे वर्णन तसेच स्त्रीच्या आभूषणाचे वर्णन ते खूपच खुबीने सुंदर रितीने करतात. त्यांच्या प्रत्येक गीतातून सौंदर्याची एक नवीन उजळणी होते. मराठी रसिकांना त्यामुळेच त्यांची गाणी आवडतात.

ऐन तारुण्यात त्यांना वीज कंपनीत खूप कष्टाची कामे करावी लागली. त्यांचे मानसिक बळ त्यामुळे खूपच चांगले होते. तरीही ते आतून बऱ्याचदा खचून गेल्यासारखे जाणवत असे. एकीकडे अहोरात्र कष्टाची कामे आणि हृदयात कवितेची मंद जळणारी ज्योत पेटलेली. त्यामुळे ते जितके कठोर, कणखर व्यक्ती म्हणून समोर येतात त्याहीपेक्षा अगदी विरुद्ध म्हणजे त्यांचे मन खूप दयाशील, मृदू आणि कोमल आहे.

कविता ह्या अशा कर्मयोगी कवीशीच आपले संधान ठेवते.

कविवर्य बाबासाहेब सौदागर गेली अनेक वर्षे गावोगावी जाऊन गीतगायनाचे कार्यक्रम देखील करतात. त्यांची सुविद्य पत्नी सौ. कविता या देखील त्यांचेबरोबर गीतगायनाचे कार्यक्रम करतात. त्यामुळे त्यांचा जीवनप्रवास मला नेहमी एक सुंदर कुटुंबाचा प्रवास वाटतो. चित्रपटसृष्टीतले अन्य कुठल्याही बाबींकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो.

'चित्ररंग' या कवितासंग्रहातील गीतांची सफर करण्यापूर्वी मला असे वाटते की त्यांची प्रत्येक कविता एक स्वतंत्र अनुभव आहे. तटस्थतेने त्या अनुभवास सामोरे जातात. त्यांना त्या कवितेतील एकूण एक क्षणांनी झपाटून टाकलेले

असते. त्यामुळे त्यांची शब्दरचना एका जादुई रचनेने उद्धृत होते. प्रत्येक कविता आतून आतून मनाला सुखवित जाते.

जसे आपण एखाद्या सुंदर पवित्र नदीच्या काठाने भ्रमण करावे तसे त्यांच्या प्रतिभेची नदी ठिकठिकाणी आपल्याला गीतांच्या स्वरूपात आनंदाच्या डोहाशी आणते. तिथला शांत, नि:स्तरंग भाव आपल्याला एक खोल गहनगूढ जीवनरसाकडे घेऊन जातो. एखाद्या शब्दापाशी आपण बराच वेळ रुंजी घालतो आणि अशातच भरून आलेल्या ढगात वीज चमकावी तसे आपले डोळे भरून येतात. मी हा सर्व अनुभव यातील 'एकशे पंधरा' कविता वाचताना घेतला आहे. त्यांच्या समृद्ध, कोमल प्रशांत काव्यशैलीचे वर्णन करण्यापेक्षा मी त्या कवितांच्या आस्वादातच अधिक रममाण होऊन जातो. त्यामुळे त्यांचे प्रत्येक गीत, त्यातील अविस्मरणीय भाव आणि त्यासाठी नटून थटून आलेली शब्दसंहिता या सर्वांचा लाभ मला स्वतंत्रपणे घ्यावसा वाटतो.

श्री. बाबासाहेब सौदागर यांची प्रत्येक कविता मला अधिकाधिक चांगल्या कविता वाचायला प्रवृत्त करते. तो अनुभव मी मांडण्याचा थोडासा प्रयत्न करीत आहे.

**चित्ररंग – कविवर्य बाबासाहेब सौदागर**

**एक –**

**नितीमत्तेची ही गाथा चंद्रभागेत बुडाली**
**तुझ्यावाचून आम्हाला आता कुणी नाही वाली**
**विटेवरून ये खाली, देवा हो रे आता जागा**
**धाव पांडुरंगा आता धाव पांडुरंगा।।**

कवीची निर्मितीऊर्जा एक त्याच्या शारीर जगण्यातलं निर्मितीस्थळ अन् त्यावर उडालेली ठिणगी असते. प्रतिकूलतेने कवी बाबासाहेब सौदागर हे सारं देखणं कवितेचे वैभव जगत त्यांच दृश्य स्वरूप शब्दाच्या माध्यमातून रसिकांना भरभरून देत आहेत. म्हणूनच ते म्हणतात, 'डोळे असून का देवा असा झालास आंधळा। पाण्यावाचून जळतो रोज सांवताचा मळा।'

गेली कित्येक वर्षे मी बाबासाहेबांच्या कवितेने अंतर्बाह्य सुखावून गेलो आहे. त्यांनी मराठी चित्रपटासाठी गाणी लिहिली. ती सर्वच गीते मूळचे कवितेचे परिणाम घेऊन एका वेगळ्या धारदार शैलीत शब्दबद्ध झाली. त्यामुळे ती केवळ गेय, गायनास योग्य अशी न राहाता तिची शब्दकळा संस्कृतीच्या दरवाजात उभे राहून ती देखण्या सौंदर्याने नटली आहे.

**दोन –**

कवी शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत जवळून अनुभवतो आहे. ऊस तोडणाऱ्या कामगारांची वेदना तो जगत आहे. त्याचप्रमाणे तो निसर्गाच्या लहरीबरोबर सुखदु:खाचे वावटळदेखील सहन करीत आहे, म्हणून ते लिहितात,

**कडेवर ठेवूनि। पानांचे दोन्ही हात।**
**विठू माऊली डोलते। तव रूप दिसे कणसात।**
**उभी देवळाच्या वाणी। माझी रानात झोपडी।**

**तीन –**

**मैतरांनो नाचू  या रे ढोल ताशे वाजवा।**
**शिवबाच्या सैनिकांनो मर्दुमकी गाजवा।।**

हे एक उत्कृष्ट गीत आहे. स्फूर्तीने ओतप्रोत भरलेले. ह्या गीतात जसं इमानानं जगण्याचं व्रत घेतले जातं. त्याचप्रमाणे श्रमाच्या फुलांनी घरदार सजवण्याचं स्वप्न अधोरेखित केलं जाते. श्रमिकांचे जीवन जगत असताना कवीच्या तळहातावर फोड आलेले आहेत. अवघं शरीर श्रमानं घामानं निथळून गेले आहे. तरीही कवी तेथे फुलांची उपमा देत जगणे कसे विलक्षण, प्रत्यक्षात कसं आहे याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**सात –**

**एक गुणी लक्ष्मीने केले दु:खाचे स्वागत।**
**भाग्यवान कुंकवाची, तिने वाढवली पत।**

'सवत' चित्रपटासाठी लिहिलेल्या ह्या गीतात ते पती-पत्नीच्या दुर्गुणावर पडदा टाकण्यासाठी सवत घरात आणते असा विषय आहे. जिला मानली बहीण तिने केला वैरभाव। अशी त्या स्त्रीची मन:स्थिती आहे. दु:खाचा डोंगर पार करून जाणारी ही पतिव्रता स्त्री कवितेत भेटते, तेव्हा डोळे आपोआपच पाणवतात.

**नऊ –**

**हुरड्याला आला जोंधळा**
**पिकली सोन सळा। सुगीचा ग मळा**
**माझ्या मनात गव्हाळी खुशी।**
**ग बाई मी मला सावरू कशी?**

एका स्त्रीच्या आनंदाला आलेले उधाण ह्या कवितेत व्यक्त केले आहे. ती ग्रामकन्या आहे. तिचा निसर्गातल्या भुलभुलैय्याशी दररोज संबंध आहे. ती

भरल्या तारुण्यात जसं पीक हुरड्याला येते त्याचप्रमाणे थंड हवेत डौलदारपणे डोलत नाचत आहे. तिच्या मनात गव्हाळी खुशी असून ती अधीर झाली आहे. पौषाची हिवाळी सर्द हवा भंडारभारलं ऊन गावाजवळच्या डोंगरदरीत उतरलेले धुकं अन् माळावर आलेले शेंदरी ढगांचा सूर्य। सारं कसं देखणं आहे.

ह्या कवितेत 'जवसाच्या फुलापरी निळे बोलके डोळे' त्याची भूल पडली आहे. हिरवा गहू लवलवतो आहे. मोहरी हाळदली आहे, चिंचा बोरी गाभुळलेल्या आहेत. त्यांत सारा जीव कसं वढाळ सैलसर झाला आहे. निसर्गाच्या ह्या चित्ररंगात कवी भाग्यविभोर झाले आहेत. अन् त्या स्त्रीचे हृदय किती मोहरून गेले यांचे नेमके ते वर्णन करीत आहे.

**बारा –**

**बाळकृष्ण हा देखणा। बाई पाळणा हालवा।**
**माय यशोदा मातेला। कुणी जवळ बोलवा।**

'सवत' चित्रपटासाठी लिहिलेले हे गीत देखील उत्कृष्ट पाळणागीत आहे. ते बाळ इतकं देखणे आहे की त्याची पाळण्याची दोरीदेखील जपून ओढ असं कवी म्हणतात. त्याला राम-कृष्णाची उपाधी दिली जाते. अन् आभाळात चांदणं होऊन तो निळ्या डोळ्यांनी हसत आहे.

हे बाळकृष्ण लीलांचे वर्णन असावे असे देखणे स्वरूप त्यात दिले आहे. शब्द देखील किती सहजसुंदर!

**चौदा –**

**मैत्रीर्णींनो नवरीला हळद लावा गं बाई।**
**हळद लावा गं।**

लग्नाच्या मंगल सोहळ्यात नवरी मुलीच्या मैत्रीणी आणि त्यांची हळद खेळण्याची लगबग ह्या कवितेत जिवंतपणे वर्णन केली आहे.

**राजवर्खी सोनबिंदी भांगा मधी जडवा**
**कस्तुरले मोतीपाणी देहावर उडवा**
**पहिला मान-विडा ठेवा गणपती देवा गं।**

राजवर्खी सोनबिंदी भागांमध्ये जडवा घरातल्या थोरल्या स्त्री मंडळी सांगताहेत तसेच गणपती पुढे पहिला विडा ठेवून तिला हळद लावा असे सूचित केले आहे.

ह्याच कवितेत मुलगी लग्नानंतर माहेर सोडून जाताना पाठच्या भावाने जन्मभर पाठीराखं व्हावं असं म्हणत आहे. ही संपूर्ण कविताच एकूण नववधूचे त्यावेळचं मन ह्दय हलकं करीत स्वत:ला समजावणी करते. मराठी कवितेत उतरणारे शब्द बऱ्याचदा गीतस्वरूपात भावगंध घेऊन येतात. इ. असे शब्द वो-हाळपक्षी ह्दयाच्या स्नेह तळाशी डोहावर तरंगत राहातात. कविवर्य बाबासाहेब सौदागर यांना हे सहज स्फुरले आहे. त्यांच्या गीतामध्ये मुद्दाम कोठे पोज घेत केलेले लिखाण वाटत नाही. ह्या संग्रहातील बहुतांश कविता चित्रपटाच्या निमित्ताने लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या अगोदर त्यांचा भावार्थ संवेदन विश्वात त्या तरंगत होत्या, हे वाचकाला जाणवते. बाबासाहेब सौदागर ज्या वेदनेच्या जगात प्रचंड अविरत श्रम व दु:ख पचवत आपल्या आयुष्याची पायवाट तुडवीत आहे. त्यात कोठेही दु:ख, हताशलेपण व किंवा उगाचच उतरणारा नैराश्याचा सूर आढळत नाही.

त्यांची गीतात्म ही कविता रसिकांना एका वेगळ्या तृप्तीचा आनंद देते. भले त्यांच्या गीतांवर चित्रपटात कितीही सुंदर, कलात्मक चित्रण केले असो. तरीही त्यांच्या कवितेचे शब्द प्रेक्षकांना वाचकास त्यासर्व चित्रपट माध्यमाच्या पलीकडे घेऊन जातात. हे त्यांचे अस्सल कवितेचे लक्षण आहे.

गेली पंधरा-वीस वर्षे बाबासाहेब सौदागर आपल्या कवितांचे कार्यक्रम करत महाराष्ट्रभर फिरत आहेत. तसेच चित्रपट किंवा दूरदर्शन, रेडिओसाठी त्यांची कविता, गीते वापरली जात आहेत. त्यांच्या भाववृत्तीत अनेक आंदोलने प्रतिदिनी घडत असतील. त्यांच्या कवितेचा अनुभव अधिक समृद्ध होत असतांना कोठेही त्यांची कविता व त्यांचे जगणे यात दुभंगलेपण जाणवत नाही. बाबासाहेब सौदागर एक व्यक्ती, मित्र, माणूस म्हणून पूर्वीइतकेच सहज आनंददायी आहेत.

**आठ –**

**चला नाचू गाऊ या रे ढोल नगारे वाजती**
**असा नवसाला पावतो, देव महागणपती।**

ह्या समूह गीतांत नवसाला पावणाऱ्या महागणपतीचे स्मरण करून ढोल, ताशे, नगारे वाजवत आपण सर्वजण नाचूया असे म्हटले आहे. रम्य चतुर्थीचा सण असून सनई-मृदुंगाच्या तालासह दुर्वा, जास्वंदी फुलांनी आज ओवाळूया असे कवी म्हणतोय. रात्री चंद्रप्रभेने देवळाच्या कळसाला न्हाऊ घातले आहे आणि त्या महागणपतीची सर्वांवर कृपा आहे. त्यामुळे भक्तही भक्तिरसात डुंबत,

नाचत, स्वत:चा उद्धार करून घेत आहेत. कवितेत सहजसुंदर शब्दलीला ही एकूण प्रसंगात अधिक शोभा आणीत आहे.

**दहा –**

**बानाई म्हाळसा संगं, निघाली मल्हारीची स्वारी।**
**देवाची सोन्याची जेजुरी, देवाची सोन्याची जेजुरी।।**

हे गीत 'सवत' ह्या चित्रपटासाठी निवडण्यात आल्याने त्यांत जेजुरीच्या खंडोबास म्हाळसा व बानाई यांची वर्णने आली आहेत. जशा दोन सख्ख्या बहिणी असाव्यात तसा म्हाळसा व बानाई ह्या सवती एकत्र आनंदाने नांदताहेत ही कविता वाचताक्षणी परंपरेने आलेल्या कथेशी वास्तवाचे चित्रण केले आहे. जेजुरी ह्या गावी महाराष्ट्रातील प्रत्येक नवपरिचित वधू-वर लग्नानंतर तेथे जाऊन दर्शन घेतात व जागरण-गोंधळाचा कार्यक्रम करतात.

**गड उंच उंच कडेपठार जिथे म्हाळसाचा संसार।**
**पायऱ्याला नांदते बनाई। पडे खंडोबाचा भंडार।**
**दोघीचा महिमा गाती वाघ्या-मुरळी दरबारी।**

**अकरा –**

**झुरे जीवाची साजणी, मला छळतो अंधार।**
**नाही मनाची तयारी। कसा करू मी शृंगार।**

ह्या कवितेत पत्नीच्या वियोगाचे दु:ख व्याकूळता व्यक्त झाली आहे. अंधरात दिवा मंद जळतोय. भोवती किर्रकुट अंधार आहे आणि हृदयात विरहाचा अंगार पेटला आहे. पत्नी दुरावली आहे आणि त्यामुळे पतिधर्म निभावता येत नाही. आरशात स्वत:ला पाहाता येत नाही. आरसा जणू हसतो आहे. तिच्या आठवणीने जीव वेडापिसा झाला आहे. तिच्या लाख लाख आठवणीने जुना सुखाचा संसार पुन्हा पुन्हा समोर येत आहे. कमीतकमी शब्दांत मनाच्या व्यथा व्यक्त झाल्याने कविता अधिक स्पष्ट आणि यशस्वी झाल्यासारखे जाणवते.

**तेरा –**

**लग्न ठरलं तुझ गं। सुख-दु:खाच्या भावना।**
**उद्या जाशील सासरी। पाणी डोळ्यात मावंना।।**

ह्या कवितेत आई-वडिलांच्या प्रेमाचे भावपूर्ण असे वर्णन आले आहे. सासरी मुलगी गेल्यानंतर तिला माहेर कायमचं पारखं होईल व ती पाहुणी बनून

राहील. माया-ममतेने मोठे केल्याने लग्नानंतर तिने लहान भावंडांना देखील जीव लावावा असे त्या गीतात वर्णन केले आहे. हे गीत 'सासरची का माहेरची' या चित्रपटात सुरेश वाडकरांनी श्री. बाळ पळसुले यांच्या संगीत दिग्दर्शनात गायले आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण भागातली लग्नं पाहिली की तिथल्या वातावरणात आई-वडिलांना स्वत:च्या लेकीला निरोप देताना जे रडू येतं, त्या दु:खात मन विदीर्ण होऊन जाते. परगावी किंवा परप्रांतात मुलगी विवाहोत्तर कशी राहील? सासरची माणसे तिचं पालन-पोषण करतील का? त्या घरात तिला सन्मानाने जगता येईल का? काबाडकष्ट करीत त्यावर पुन्हा दु:खाच्या डागण्या दिल्या जातील अशी अनेक प्रश्नचिन्हं आई-वडिलांच्या समोर उभी राहतात.

कधी कधी असं वाटतं, बाबासाहेबांची कविता ही केवळ स्त्रीविश्वाचं अन् वेदनेचेच वर्णन करते का? की त्याभोवती त्यांच्या जगण्यातल्या काही खाणाखुणा स्पष्ट होताहेत? स्त्री वेदनेचा एवढा जीव हेलावून टाकणारा अनुभव कवी म्हणून ते कसं काय पचवतात?

श्री. बाबासाहेब सौदागरांची कविता किंवा त्यांनी चित्रपटासाठी लिहिलेली गीतं ही सर्व जनतेसमोर खुल्या पुस्तकाप्रमाणे त्यांनी ठेवली आहे. एवढे सारे असूनही ते इतका व्यथित वाटावा असा तीव्र अनुभव गीतात कसा व्यक्त करू शकतात. आज समकालीन कविता वाचतांना इतर कवींचे ह्या पातळीवरचे अनुभव इतके सरळ असतात की ते गाण्याच्या माध्यमात व्यक्त होत नाही. ते जगण्याची वेगळी परिभाषा, कविताची वेगळी शैली शोधतात. इथे बाबासाहेबांच्या कवितेत तसे नाही. सारेकाही सहज कळलेल्या शब्दात, सहजसुंदर गतिमान, ते सारं चित्र गीत माध्यमातून उभं करतात. त्यांच्या कवितेचं ते एक आगळे वेगळे रूप आहे.

**पंधरा -**

**भक्ती माझी सरून गेली या नशिबावरची।**
**सांग मुली तू कोणाघरची सासरची का माहेरची?।।**

हे गीत सुद्धा ऐकतांना वाचतांना एक प्रश्नचिन्ह उभं करते. ज्या कन्येचे संगोपन तळ हाताच्या पाळणा करत मोठ्या मायेने केलं, ते प्रेम, ती माया आता तिच्या सासरी जाण्याने स्फुंदत, रडत आहे. तिचे बालपणातले खेळणे-भांडी आता यापुढे